# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

वाचा: १) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण-१५२५/ प्र.क्र.०९/६-अे, दिनांक २९/०५/२०२५.

२) सहसंचालक, कृषी परिषद, पुणे यांचे पत्र क्र. मकृप/आस्था-३/१५७३/२०२५, दिनांक ०३/०६/२०२५

## परिपत्रक

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक/वस्तुस्थितीदर्शक/1702 /२०२५ दिनांक : 07 /०७/२०२५

संदर्भिय शासन पत्रान्वये विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिध्द होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या / प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय / वस्तुस्थितीदर्शक माहिती सादर करणेबाबत निर्देश आहेत.

त्याअनुषंगाने चारही कृषि विद्यापीठामध्ये विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिध्द होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या / प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय / वस्तुस्थितीदर्शक माहितीबाबत शासन परिपत्रकानुसार वेळोवेळी कार्यवाही करावी. तसेच संबंधित बातमी प्रसिध्द झाल्यापासून कमाल एक दिवसात याबाबतचे वस्तुस्थितीदर्शक अभिप्राय प्रसिध्द करण्याबाबत दक्षता घ्यावी, असे मा. सहसंचालक (प्रशासन), कृषि परिषद पुणे यांनी पत्राव्दारे कळविलेले आहे.

करीता विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी, कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदर पत्रामध्ये दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी. तसेच माहिती शासनास तातडीने सादर करणेबाबत आपले अधिनस्त कार्यालयांना आपल्या स्तरावर कळविण्यात यावे.

सुलभ संदर्भाकरीता सोबत पत्र संलग्न करण्यात येत आहे.

(डॉ. एस. के. ठाकरे)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

सोबत : वरीलप्रमाणे

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व) ----------
२) अधिष्ठाता (सर्व) ----------
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------
४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ----------
५) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व) ----------
७) प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय (सर्व) ----------
८) प्रभारी अधिकारी (सर्व) ----------
९) प्रभारी अधिकारी (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
१०) विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ----------
११) विद्यापीठ नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला
१२) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१३) सहाय्यक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि.) ---
१४) सहाय्यक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/ अधिदान व लेखाधिकारी (अकोला/ नागपूर)
१५) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक/ तांत्रिक सचिव/ विशेष कार्यकारी अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
१६) मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना माहितीकरीता सादर.
१७) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१८) ----------

c/1

MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

इ मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८२०८

संकेतस्थळ- www.mcaer.org

जा. क्र. मकृप/आस्था-३/१५६३/२०२५ दिनांक :- ०३/०६/२०२५

प्रति,

कुलसचिव

१. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
२. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
३. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
४. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

**विषयः-** विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिध्द होणा-या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय/वस्तुस्थितीदर्शक माहिती तातडीने सादर करण्याबाबत.

**संदर्भः-** शासन पत्र क्र.संकीर्ण-१५२५/प्र.क्र.०९/६-अे, दि.२९/०५/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय शासन पत्रान्वये विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिध्द होणा-या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय/वस्तुस्थितीदर्शक माहिती सादर करण्याबाबत कळविले आहे. सदरहु पत्रातील विषयाच्या अनुषंगाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, असेही कळविले आहे.

याबाबत असे निदर्शनास आले आहे की, चारही कृषी विद्यापीठांबाबत वेळोवेळी प्रसार माध्यमांमध्ये वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या किंवा अभिप्रायाची आवश्यकता असलेल्या बातम्या प्रसिध्द होत असतात. तथापि त्याबाबत संबंधीत विभागाकडून कोणतीही प्रतिक्रिया प्रसार माध्यमांव्दारे दिली जात नाही.

सबब, चारही कृषी विद्यापीठांमध्ये विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिध्द होणा-या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय/वस्तुस्थितीदर्शक माहितीबाबत परिपत्रकांनुसार वेळोवेळी कार्यवाही करावी. तसेच संबंधीत बातमी प्रसिध्द झाल्यापासून कमाल एक दिवसांत याबाबतचे वस्तुस्थितीदर्शक अभिप्राय प्रसिध्द करण्याबाबत दक्षता घ्यावी.

सोबतः- वरिलप्रमाणे

(वैभव शिंदे)
सहसंचालक (प्रशासन)
कृषी परिषद, पुणे

प्रतः- कक्ष अधिकारी, ६-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.

Dv. R. Estt./ Gad./ Acad
05/06/25

O/o Registrar
No. R/154
Date 6/6/25
Dr. P.D.K.V., AKOLA

REGISTRAR OFFICE
DR. P.D.K.V., AKOLA
0 9 JUN 2025
In. No. 135

c|3

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

दालन क्र.५३५, मंत्रालय विस्तार भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०२३११६ Email:desk6a.agri-mh@gov.in

---

क्रमांक : संकिर्ण-१५२५/प्र.क्र.०९/६-अे दिनांक : २९.०५.२०२५

प्रति,

महासंचालक,
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
पुणे.

**विषय:-विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिध्द होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय/वस्तुस्थितीदर्शक माहिती तातडीने सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :-** कक्ष अधिकारी कार्यासन १२-अे यांचे दि.२५.०५.२०२५ रोजीचे पत्र.

**महोदय,**

संदर्भाधीन पत्राची प्रत या सोबत जोडण्यात आलेली आहे.

२. सदरहू पत्रातील विषयाच्या अनुषंगाने नियमानुसार योग्यती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी, ही विनंती.

सोबत :- वरीलप्रमाणे.

आपला,

(रोहिदास खोकले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१.कुलसचिव,महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी
२.कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
३.कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोल
४. कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय विस्तार इमारत , दालन क्र.५४८, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दूरध्वनी क्र.०२२-२२०२६५४७ ई-मेल: so12a-agri@mah.gov.in

---

क्र.: संकिर्ण-२०२५/प्र.क्र.४२/१२-अे दि.: २१/०५/२०२५

प्रति,

१) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे

२) अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व)कृषि विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**विषय :** विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिद्ध होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/ प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय/ वस्तुस्थितीदर्शक माहिती तातडीने सादर करण्याबाबत...

**संदर्भ:** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१७/मावज-१, दि. २८/०३/२०२५

महोदय,

संदर्भाधीन शासन परिपत्रकाचे कृपया अवलोकन व्हावे.

२. सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिद्ध होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय/ वस्तुस्थितीदर्शक माहिती तातडीने सादर करण्याबाबत सर्व विभागांना सूचना दिल्या आहेत.

शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या योजना, धोरणे, प्रकल्प इ. बाबत त्याच प्रमाणे राज्यात घडणाऱ्या अनेक घटनांबाबतही विविध प्रकारच्या माध्यमांमध्ये जसे प्रिंट, रेडिओ, टिव्ही, डिजिटल मीडिया इ. वर सकारात्मक तसेच बऱ्याचदा वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/ दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध होतात. अशा प्रकारच्या बातम्यांबाबत राज्य शासनाद्वारे वस्तुस्थितीदर्शक माहिती/ अभिप्राय त्याचवेळी म्हणजे संबंधित बातमी प्रसिद्ध झाल्यापासून कमाल एक दिवसाच्या आत प्रसिद्ध होणे अपेक्षित आहे.

त्यानुसार आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनेची अंमलबजावणी करावी तसेच, सदर सूचना आपल्या अधिनस्त कार्यालयांना देण्याबाबत कार्यवाही करावी.

२१.०५.२०२५

(सचिन थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

C:\Users\Rajendra.Kharat\Downloads\Letters (3).docx

c|5

१

विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाबद्दल प्रसिध्द होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत अभिप्राय/ वस्तुस्थितीदर्शक माहिती तातडीने सादर करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१७/मावज-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

दिनांक : २८ मार्च, २०२५

## प्रस्तावना :-

शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या योजना, धोरणे, प्रकल्प इ. बाबत त्याच प्रमाणे राज्यात घडणाऱ्या अनेक घटनांबाबतही विविध प्रकारच्या माध्यमांमध्ये जसे प्रिंट, रेडिओ, टिव्ही, डिजिटल मीडिया इ. वर सकारात्मक तसेच बऱ्याचदा वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या / दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध होतात. अशा प्रकारच्या बातम्या या राज्य शासनास सुयोग्य कार्यपध्दतीचा अवलंब करण्याच्या अनुषंगाने अभिप्राय (फिडबॅक) देणारी एक उत्तम यंत्रणा म्हणून कार्य करु शकतात.

वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/दिशाभूल करणाऱ्या अशा प्रकारच्या बातम्यांबाबत राज्य शासनाद्वारे वस्तुस्थितीदर्शक माहिती/अभिप्राय त्याचवेळी म्हणजे संबंधित बातमी प्रसिद्ध झाल्यापासून किमान एक दिवसाच्या आत प्रसिद्ध होणे अपेक्षित आहे. अशा बातम्यांचे/ घटनांचे गांभीर्य शासनाने विचारात घेऊन व त्याची दखल घेऊन त्यास तातडीने प्रतिसाद दिल्यास शासनाची जनमानसांमध्ये असलेली प्रतिमा उंचावण्यास मदत होते. तथापि, असे जरी असले तरीही शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाच्या एकूण कार्यपद्धती विषयक प्रसिद्ध होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या /दिशाभूल करणाऱ्या बातम्यांचा प्रतिसाद राज्य शासनाच्या विभागांकडून तातडीने करण्यास तत्परता दर्शविण्यात येत नाही. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १३ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने तसेच मा. मुख्यमंत्री यांनी यासंदर्भात दि.०३.०२.२०२५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या नियोजन आराखड्यात, विविध प्रसिद्धी माध्यमांमध्ये राज्य शासनाच्या कार्यपद्धती/कामकाज विषयक प्रसिद्ध होणाऱ्या प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती संबंधित विभागाकडून तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभागांसाठी एक सविस्तर सूचनात्मक स्वरुपाची कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक :

विविध प्रसार माध्यमांमध्ये राज्य शासनाच्या कार्यपद्धती/कामकाज विषयक प्रसिद्ध होणाऱ्या वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या /दिशाभूल करणाऱ्या बातम्यांबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती तातडीने उपलब्ध करुन देण्याकरिता खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

१. वर्तमानपत्रांमध्ये (प्रिंट मीडिया) वरीलप्रमाणे प्रसिद्ध होणाऱ्या प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांचे संकलन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाव्दारे केले जाईल व अशा बातम्यांची कात्रणे व मजकूर त्याच दिवशी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने तयार केलेल्या संगणक प्रणालीद्वारे (software tool) संबंधित विभागांकडे पाठविले जातील.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या खुलासा करण्यायोग्य बातम्यांची दृकश्राव्य फीत (Audio visual clip) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने तयार केलेल्या संगणक प्रणालीद्वारे (software tool) तसेच या संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या सचिवांच्या समुहावरसुध्दा (Group) उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. संबंधित विभागांनी प्राप्त झालेल्या बातमीचे गांभीर्य विचारात घेऊन तातडीने आपल्या अधिनस्त कार्यालयांकडून माहिती घेऊन अशा बातम्यांबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती / विभागाचे अभिप्राय सचिवांची मान्यता घेऊन वर्तमानपत्रातील (प्रिंट मीडिया) बातमीसंदर्भात बारा तासाच्या आत महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांच्या कार्यालयास (संचालक (वृत्त व जनसंपर्क) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय) यांच्या शासकीय ई-मेलवर/ ई-ऑफिसद्वारे तसेच संबंधित विभागीय संपर्क अधिकारी यांना पाठवावे.

३. सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये (दूरचित्रवाहिन्या (टिव्ही), रेडिओ, डिजिटल माध्यमे इ.) प्रसारित होणाऱ्या प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत विभागांची वस्तुस्थितीदर्शक माहिती/अभिप्राय संबंधित विषयाचे मा. मंत्री/मा. राज्यमंत्री/सचिव/आयुक्त किंवा त्या विषयाशी संबंधित अधिकारी यांचे बाईटसह दोन तासांच्या आत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास वरील प्रमाणेच उपलब्ध करुन द्यावी.

४. यासंदर्भातील कार्यवाही अधिक जलदगतीने होण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सहसचिव/उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करुन याबाबतची जबाबदारी त्यांचेवर सोपवावी, जेणेकरुन वस्तुस्थितीदर्शक माहिती/अभिप्राय एकत्रितपणे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास तातडीने उपलब्ध करुन देता येईल. या अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile no.) विभागांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास उपलब्ध करुन द्यावेत. संबंधित अधिकारी बदलल्यास त्याबाबतही महासंचालनालयास तातडीने अवगत करावे.

५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी वरील प्रकारे प्राप्त झालेल्या वस्तुस्थितीदर्शक माहिती/अभिप्रायाचे संकलन करुन ती त्याच दिवशी महासंचालनालयाच्या ब्लॉग/संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, तसेच संबंधित वर्तमानपत्र/वृत्तवाहिन्या/डिजिटल मीडियाकडे खुलासा प्रसिद्ध करण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

६. राज्यस्तरीय विषयासंदर्भात जिल्हा/तालुका पातळीवर प्रकाशित होणाऱ्या प्रतिसाद देण्यायोग्य ज्या बातम्यांचा संबंध राज्य शासनाच्या धोरणाशी किंवा शासनाच्या पातळीवर घ्यावयाच्या निर्णयांशी निगडीत असेल फक्त अशाच बातम्या संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांनी महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांच्याकडे पाठवाव्यात.

तसेच अन्य वस्तुस्थितीदर्शक नसलेल्या/दिशाभूल करणाऱ्या प्रतिसाद देण्यायोग्य जिल्हास्तरीय विषयाशी संबंधित बातम्यांबाबत जिल्हास्तरावरच वरील प्रमाणे खुलाशाची कार्यवाही करावी. अशा जिल्हा स्तरावरील बातम्यांचा एकत्रित विभागीय स्तरावरील अहवाल संबंधित विभागाच्या संचालक (माहिती)/उपसंचालक (माहिती) यांनी एकत्रितपणे दर महिन्याला महासंचालक यांच्याकडे पाठवावा.

७. केंद्र शासनाशी संबंधित राज्यामधील बाबींसदर्भातील बातम्या महासंचालनालयाने पत्र सूचना कार्यालय (PIB -Press Information Bureau) कडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवाव्यात.

८. विभागांनी त्यांचे वस्तुस्थितीदर्शक माहिती/अभिप्राय माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास उपलब्ध करुन देताना ती पुढील नमूद मुद्यांच्या आधारे सादर करावी :-

१. बातमीमध्ये उपस्थित केलेले मुद्दे, माहिती यामध्ये तथ्य आहे किंवा नाही.
२. बातमीमध्ये तथ्य नसल्यास प्रत्यक्षात वस्तुस्थितीदर्शक माहिती/आकडेवारी काय आहे.
३. बातमीमध्ये नमूद मुद्यांबाबत/त्रुटींबाबत विभागाची कारणमीमांसा.
४. बातमीच्या अनुषंगाने विभागाने यापूर्वी केलेली/करण्यात येणारी कार्यवाही.
५. वरील मुद्यांची माहिती थोडक्यात व संबंधित बातमीतील मुद्यांच्या आधारे द्यावी.

९. वरीलप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीचे टप्पे व कालावधी याचे थोडक्यात विवरण :-

| अ.क्र. | बातमीवर करावयाच्या कार्यवाहीचे टप्पे | कार्यवाही करणारे अधिकारी | पूर्ततेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | बातमी प्राप्त होणे व तिचे वर्गीकरण | महासंचालनालयातील वृत्त शाखा माध्यम प्रतिसाद केंद्र (MRC) | त्वरीत |
| २ | बातमी संबंधित विभागाकडे पाठविणे | विभागीय संपर्क अधिकारी (DLO) | त्वरीत |
| ३ | विभागाने उत्तर देणे | संबंधित विभागाचा समन्वय अधिकारी (Departmental Nodal Officer) | इलेक्ट्रॉनिक २ तास, प्रिंट-१२ तास |
| ४ | विभागांकडून प्राप्त माहिती वस्तुस्थितीदर्शक खुलासा माध्यमांकडे पाठविणे | विभागीय संपर्क अधिकारी (DLO) | १ तास |

१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी प्रतिसाद देण्यायोग्य बातम्यांबाबत त्यांच्याकडे प्राप्त झालेले अभिप्राय/वस्तुस्थितीदर्शक माहितीबाबत त्यांचा अहवाल मा. मुख्यमंत्री महोदय व मा. मुख्य सचिवांना पुढील विवरण पत्रामध्ये प्रत्येक महिन्यास सादर करावा:-

| अनुक्रमांक | संबंधित विभाग | बातमी संख्या | माध्यमाचे नाव (वृत्तपत्र, वृत्तवाहिनी इ.) | अभिप्राय/ वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त संख्या | विभागाकडून प्रलंबित असलेले अभिप्राय/ वस्तुस्थितीदर्शक अहवाल संख्या | विभागांनी दिलेली माहिती माध्यमांनी प्रसिद्ध केली/नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

११. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने विभागांकडून प्राप्त झालेले अभिप्राय/वस्तुस्थितीदर्शक अहवाल हे संबंधित प्रिंट/ इलेक्ट्रॉनिक माध्यमांना पाठवून ते यथोचितरित्या प्रसिद्ध होतील, यासाठी पाठपुरावा करावा.

अशा पद्धतीने प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या प्रतिसाद देण्यायोग्य असलेल्या बातम्यांबाबत शासनाकडून सुयोग्य तसेच विहित कालावधीत प्रतिसाद मिळाल्यास जनतेस शासनाच्या योजना, धोरणे याविषयी वस्तुस्थितीदर्शक तसेच सकारात्मक माहिती मिळण्यास मदत होईल.

१२. याबाबत मुख्य सचिव कार्यालयामार्फत सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचा दरमहा आढावा घेण्यात येईल. या कार्यपद्धतीचे क्षेत्रीय तसेच मंत्रालयीन स्तरावर काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी प्रत्येक विभागाच्या सचिवांची राहील. या कामकाजास सर्व मंत्रालयीन विभागांनी सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

१३. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०३२८११५६१६२७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुजाता सौनिक)
मुख्य सचिव

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.